# Marathi Department has organized a *Mazi Bhasha, Mazi Sahi* (My Language, My Signature) programme






पुण्य नगरी

# मराठी भाषेचा दैनंदिन जीवनातील वापर वाढवावा

## ■ राजेंद्र कुरळपकर : माझी भाषा माझी सही उपक्रम

**आष्टा / प्रतिनिधी**

येथील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथे मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने माझी भाषा, माझी सही हा उपक्रम उत्साहाने साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन केल्यानंतर प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर म्हणाले, आपली राष्ट्रभाषा जरी हिंदी असली तरी आपणाला आपली जन्मभूमी असलेल्या महाराष्ट्र राज्याचा अभिमान बाळगला पाहिजे.



**आष्टा : माझी भाषा, माझी सही या उपक्रमाचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर. बाजूस प्राध्यापक.**

मातृभाषा व राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा दैनंदिन व्यवहारिक जीवनातील वापर वाढवणे गरजेचे आहे. आपल्या सर्वांची जडणघडण ही मराठीतून झाल्याने सर्वच शैक्षणिक अभ्यासक्रमाची भाषा मराठी असणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे न्यायालयीन व प्रशासकीय कामकाजात देखील मराठीचा वापर होणे आवश्यक आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. डी. जे. दमामे यांनी केले. आभार डॉ. सुनील पाटील यांनी मानले. याप्रसंगी उपस्थितांनी फलकावरती मराठीमध्ये आपली स्वाक्षरी करून मराठीचा जागर केला.

Smart Sangli Edition
Mar 1, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com